# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०९/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

## नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडुन सन २०२४ च्या गणपती विसर्जन बंदोबस्ताची संपुर्ण तयारी

सार्वजनिक आणि घरगुती गणपतीचे विसर्जन दिनांक १६/०९/२०२४ ते २२/०९/२०२४ रोजी होणार असुन गणपती विसर्जना दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. विसर्जन बंदोबस्तासाठी नागपूर ग्रामीण येथील मा. पोलीस अधीक्षक सा. व मा. अपर पोलीस अधीक्षक सा. यांचेसह पोलीस उपअधिक्षक –०७, पोलीस निरीक्षक –२५, पोलीस उपनिरीक्षक/ सहा. पोलीस निरीक्षक –११०, पोलीस अंमलदार –१४५०, महिला पोलीस अंमलदार –२५०, होमगार्ड सैनिक–६५०, आरसीपी पथक –०२, एस आरपी प्लाटुन –०१ असा कडेकोट बंदाबस्त लावण्यात आलेला आहे.

पोस्टे खापरखेडा अंतर्गत नांदा (कोराडी) आणि किल्लेकोलार घाट विसर्जना दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे तसेच मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर व मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्हयातील सर्वत्र गणेश मुर्ती विसर्जन हे नैसर्गिक नाले आणि तलावामध्ये न करता शासनाद्वारे तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावामध्ये करणे अनिवार्य आहे. त्यासाठी विसर्जनस्थळी **कृत्रिम तलाव** तयार करण्यात आलेले आहे. विसर्जनस्थळी बॅरीकेट्स लावण्यात आलेले असुन पोलीस मदत केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे.

सार्वजनिक गणपती उत्सव मध्ये कोणताही अनुचित किवा घातपाताचा प्रकार होऊ नये म्हणुन घातपात विरोधी पथक (BDDS) ने जिल्हयातील गर्दीचे ठिकाण रेल्वे स्टेशन, बस स्टॅड, थर्मल पावर स्टेशन अशा ठिकाणी तपासणी केली असुन या कालावधी मध्ये कुठल्याही व्यक्तीने आक्षेपार्ह पोस्ट सोशल मिडीयावर केली तर त्यासंबंधाने सोशल मिडीया सेलने अशा लोकांवर विशेष लक्ष ठेवण्याकरीता टुल उपलब्ध करून लक्ष ठेवण्यात येत आहे. बंदोबस्ताची पुर्वतयारी म्हणुन दहशतवादी विरोध कक्ष (ATC) नागपूर ग्रामीण जिल्हयात मज्जिद, आकाशवाणी केंद्र, रेल्वे स्टेशन मुख्य ठिकाणी फार्म हाउस, लॉजेस झोपडपट्टी परीसर, मॅग्जीन हाउस व इतर महत्त्वाच्या ठिकाणी तपासणी केलेली आहे.

सार्वजनिक गणपती उत्सवाच्या कालावधीमध्ये व विसर्जनाच्या दिवशी नागरीकांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याकरीता व्हिडीओग्राफी करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गणपती विसर्जन स्थळावर सी. सी. टी. व्ही कॅमेरेची व्यवस्था केली असुन विसर्जना दरम्यान जे कोणी उल्लढबाजी किंवा अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यावर त्वरीत प्रतिबंध घालता येईल. त्याचबरोबर विसर्जन स्थळी लाईफ गार्ड दिलेले असुन विसर्जनाच्या वेळी व दुसऱ्या दिवशी विसर्जन केलेल्या मुर्तीचे अवशेष हटविण्याकरीता व्यवस्था केलेली आहे.

तरी गणपती विसर्जन शांततेत पार पाडण्याकरीता मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी स्वत: सर्व घटकाच्या बैठका घेवुन महत्त्वाच्या विसर्जन स्थळावर भेट देवुन पाहणी करून सुचना दिल्या.

# <u>अरोली हद्‌दीतील जुगार अड्डयावर धाड</u>
# <u>नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई</u>

दि. १५/०९/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. च्या सुमारास पोलीस स्टेशन अरोलीचे अधिकारी व स्टॉफ सह पोलीस स्टेशन अरोली हद्दीत पेट्रोलींग करित असतांना विविध ठिकाणी तास पत्तेचा खेळ पैसे लावुन खेळत असल्याचे मुखबीरद्वारे पक्की माहीती मिळाल्याने सपोनि स्नेहल राऊत पोस्टे अरोली ठाणेदार यांच्या आदेशावरून पोउपनि सोनवने, सफौ. जाधव, पोहवा बाजनघाटे, पोहवा पोकळे, पोहवा बगमारे यांनी सापळा रचुन मौजा मसला (टोली) येथे सुर नदीच्या बाजुला असलेल्या मारोती चौधरी यांचे पाणठेल्या जवळील वडाच्या झाडाखाली काही लोक ५२ ताश पत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याचे दिसल्याने शिताफीने जावुन धाड टाकण्यात आली असता पोलीसांना पाहुन पळुण जाण्याचा प्रयत्न केला असता त्याचा पाठलाग करून ५ इसमांना पकडण्यात पोलीसांना यश आले त्यामध्ये काशीनाथ मथुरे, विठ्ठल मोहनकर, मारोती हटवार, जगदिश हटवार, मारोती चौधरी यांना ताब्यात घेवून त्यांच्यावर महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यावेळी त्यांच्याकडुन घटना स्थळावरून तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या त्यामध्ये तीन दुचाक्या किंमती एकुण १,२५,०००/—रू. तीन मोबाईल किंमती एकूण ११,०००/— रू. आणि नगदी ३५९०/— रू. तसेच पत्ते ५०/— रू. असा एकुण १,३९,६९०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

त्याचप्रमाणे मौजा मसला, मौजा किरणापुर येथे सुध्दा जुगार खेळणाऱ्यांवर धाडी टाकण्यात आल्या त्यामध्ये मसला येथे दुसऱ्या धाडीत किसना सयाम, शुभम चौधरी, अरूण चौधरी, रमेश सयाम, सचिन हटवार यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन चार ॲन्ड्रॉईड मोबाईल फोन किंमती एकुण २०,०००/— रू. नगदी रक्कम २२३०/—रू. पत्ते ५०/— रूपये असे एकुण २२,२८०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच तिसरी धाड मौजा किरणापुर येथे जुगार खेळणाऱ्यांवर टाकण्यात आली त्यामध्ये राजु पिसे, भिवा हटवार नरेंद्र घरडे, विलास डोंगरे, गुलाब कळवे यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन एक दुचाकी किंमती २५,०००/—रू. दोन ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती अंदाजे १०,५००/— रू. एकुण नगदी ३३६०/— रू. ताशपत्ते ५०/— रू असा एकुण ३८९१०/— रूपयाचा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

वरिल प्रमाणे अरोली पोलीस स्टेशन हद्‌दीत तीन यशस्वी जुगार रेड करून नगदी एकूण ९१८०/— रुपये, ९ मोबाईल किंमती एकुण ४१,५००/—रू तसेच एकुण चार मोटर सायकल किंमती एकुण १,५०,०००/— रू. व बावन ताशपत्तेचे चार कॅट एकुण किंमती २००/—रू. असा एकुण २,००,८८०/—रूपयाचा मुद्‌देमाल वरिल एकुण १५ आरोपीकडुन जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनात पोस्टे अरोली ठाणेदार सपोनि स्नेहल राऊत, पोउपनि सोनवने, सफौ जाधव, पोहवा बाजनघाटे, पोहवा पोकळे, पोहवा बगमारे, पोशि राकेश, विक्की, मुदनर, सुखदेवे, परसगाये, होमगार्ड सैनिक यांनी पार पाडली.

## नागपूर ग्रामीण हद्दीत ईद– ए– मिलाद सण शांततेत पार पडला

दिनांक १६/०९/२०२४ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोस्टे अंतर्गत ईद– ए– मिलाद सण मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला असुन त्या दरम्यान एकुण ४८ मिरवणुका काढण्यात आल्या असुन एकुण ४३ ठिकाणी मुस्लीम बांधवांनी नमाज पठण केले. मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत बंदोबस्त लावण्यात आलेला होता. ईद– ए– मिलाद सण शांततेत पार पडला.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**